# Department of Political Science

## Departmental Activities- 2018-19 to 2024-25

## ACTIVITIES

1) One day workshop on "Competitive Examination Guidance" was organized for 2018-19 on Date -15 September 2018, Mrs. Bhagyashri Kulkarni (Inspector, Maharashtra State Excise, Government of Maharashtra) were present as a chief guest and delivered special talk on Competitive Examination Guidance Principal Dr. P.R Thorat.
2) Adv. Vikas Jadhav gave guidance on “Jago Grahak” on the occasion of Consumer Protection Day on 24th September 2019.
3) On 20 December 2018, Panchayat Samiti was visited at Barshi as part of the Visit to Local Self-Government Organisations. On this occasion, Block Development Officer Pramod Kale gave guidance.
4) A voter awareness workshop was organized on February 15, 2019. Guest Guided by Principal Dr. S.S. Gore. Presided over by Principal Dr. Prakash Thorat was great.
5) On January 2, 2019, Devgaon (Tal- Barshi) was adopted as part of the cleanliness of drive on the occasion of Mahatma Gandhi’s 150th Birth Anniversary.



श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे

**श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.**

*राज्यशास्त्र विभाग*

*(सामंजस्य करारांतर्गत)*

**"स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन एक दिवशीय कार्यशाळा"**

दिनांक २५ सप्टेंबर २०१८

**कार्यक्रमपत्रिका**

**उद्घाटन समारंभ** *सकाळी १० ते ११*

- **प्रतिमापूजन :** हस्ते उद्घाटन समारंभाचे प्रमुख मा. पी. टी. पाटील (सहसचिव)
- **प्रास्ताविक :** डॉ. पी.एम. लावंड (राज्यशास्त्र विभागप्रमुख)
- **सत्कार समारंभ :**
- **मा.पी.टी. पाटील** (*सहसचिव,श्री.शि.शि.प्र.मं.बा.*) **हस्ते** प्राचार्य डॉ. पी.आर. थोरात
- प्राचार्य डॉ. पी.आर. थोरात **हस्ते** डॉ. पी.एम. लावंड
- प्रा.डॉ. भारती रेवडकर (कला शाखा समन्वयक) **हस्ते** डॉ. पी.एम. लावंड
- डॉ. डी. डी. कराड (विज्ञान शाखा समन्वयक) **हस्ते** प्रा. समाधान लोंढे
- डॉ. एस.डी. पवार (नॅक समन्वयक) **हस्ते** प्रा. दत्तात्रय मांजरे
- **मार्गदर्शन :** मा.पी.टी. पाटील (*सहसचिव, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी*)
- **अध्यक्षीय समारोप :** प्राचार्य डॉ. पी. आर. थोरात
- **आभार :** प्रा. दत्तात्रय मांजरे (सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र)

**सत्र पहिले** *सकाळी ११ ते १२*

- **प्रमुख मार्गदर्शक :** डॉ. सुशील शिंदे (सिनेट सदस्य, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर)
- **विषय :** स्पर्धा परिक्षाचा अभ्यासक्रम आणि संदर्भ साहित्य
- **अध्यक्ष :** डॉ. समाधान पवार (इंग्रजी विभागप्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी)
- **आभार :** प्रा. समाधान लोंढे (सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र)

**अल्पोहार: १२.०० ते १२.१५**

**सत्र दुसरे** *दुपारी १२.१५ ते १.१५*

- **प्रमुख मार्गदर्शक :** कु. भाग्यश्री कुलकर्णी (Excise Sub Inspector, Pune)
- **विषय :** राज्यसेवा पूर्व परिक्षा व मुख्य परिक्षाची तयारी
- **अध्यक्ष :** डॉ. आर.आर. कोठावळे (संगणकशास्त्र विभागप्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी)
- **आभार :** प्रा. दत्तात्रय मांजरे (सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र)

Programme



*Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi's*

**Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi.**

*Reaccredited 'A' grade by NAAC*

*One Day Workshop On*

*Competitive Examination Guidance*

# Certificate

*This is to certify that Mr./Mrs. ------------------------------------------------ From---------------------------- ---------------------------- has participated in the One Day workshop On Competitive Examination Guidance organized by Department of Political Science of this college under the MoU, held on 25th September, 2018.*

Dr. Pandit Lawand
Coordinator & HOD

Dr. Prakash Thorat
Principal

Certificate Sample



Chief Guest: Mrs. Bhagyashri Kulkarni



# बार्शीत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

दि. २५ सप्टे. २०१८

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी** : येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने सामंजस्य करार अंतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सोलापूर विद्यापीठाच्या अधीसभेचे सदस्य पी. टी. पाटील, प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, नॅक समन्वयक प्रा. डॉ. समाधान पवार, कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. पंडित लावंड, प्रबंधक प्रमोद जाधव, प्रा. सतीश घाडगे उपस्थित होते. प्रा. डॉ. सुशील शिंदे यांनी स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम व संदर्भ साहित्य यावर तर राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक भाग्यश्री कुलकर्णी यांनी राज्यसेवा परीक्षेची तयारी याविषयावर मार्गदर्शन केले. पोलीस उपनिरीक्षक सारिका गटकुळ यांनी पीएसआय, एसटीआय आणि असिस्टंट परीक्षेची तयारी या विषयावर मार्गदर्शन केले. समारोप सत्रात प्रा. डॉ. आर.एस. कोठावळे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. पंडित लावंड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. समाधान लोंढे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. दत्तात्रय मांजरे यांनी केले.

Competitive Examination Guidance News Dated 25 September 2018

| | |
|---|---|
|   |  |
| Chief Guest: Dr. Rartndeep Sonkamble | Chief Guest: Adv. Vikas Jadhav |

लोकमत

# समृद्ध राष्ट्रासाठी स्वच्छता महत्त्वाची

## डॉ. प्रकाश थोरात : देवगाव येथील कार्यक्रमात प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क



देवगाव येथे स्वच्छता उपक्रमावेळी स्वच्छतादूत विद्यार्थांसमवेत प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, डॉ. पंडित लावंड, उपसभापती अविनाश मांजरे, सरपंच राधा मांजरे, ग्रामसेविका जयश्री चव्हाण, प्रबंधक प्रमोद जाधव, मुख्याध्यापक डी. यू. फुरडे, डॉ. रामेश्वर कोठावळे आदी.

**बार्शी** : नागरिकांनी आपला रहिवास असलेला परिसर व सार्वजनिक ठिकाणं यांची स्वच्छता ठेवल्यास देशाच्या स्वच्छता उद्दिष्टाची पूर्तता होऊन भारत एक स्वच्छ व समृद्ध राष्ट्र नक्की होईल, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात यांनी केले.

महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी यांनी स्वच्छता उपक्रमासाठी दत्तक घेतलेल्या देवगाव येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ. पंडित लावंड, प्रबंधक प्रमोद जाधव, पं. स. उपसभापती अविनाश मांजरे, सरपंच राधा मांजरे, मुख्याध्यापक डी. यू. फुरडे, ग्रामसेविका जयश्री चव्हाण, डॉ. रामेश्वर कोठावळे व पोलीस पाटील विशाल मांजरे उपस्थित होते. डॉ. थोरात म्हणाले, शासन आदेशानुसार महाविद्यालयाने देवगावची स्वच्छता उपक्रमासाठी निवड केली आहे. महात्मा गांधी यांचे विचार व स्वच्छतेबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती व्हावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. स्वच्छतेबाबत समाजाचे मानसिक परिवर्तन गरजेचे आहे. सार्वजनिक स्वच्छतेवर समाजाचे मानसिक व शारीरिक आरोग्य अवलंबून आहे. स्वच्छतेची संकल्पना व्यापक असून स्वच्छ व सुंदर परिसरासाठी विविध उपाययोजना करणे आवश्यक आहे. यावेळी डॉ. थोरात यांनी वैयक्तिक स्वच्छतेसाठी महत्त्वाच्या टीप्स देऊन उपस्थितांना स्वच्छतेबाबतच्या कर्तव्याची जाणिव करुन दिली.

यावेळी डॉ. पंडित लावंड यांनी सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेसाठी उपाययोजना व महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. थोरात यांनी ग्रामस्थांनी शौचालयाचा १०० टक्के वापर करून आपले गाव निर्मल ठेवले पाहिजे. शासन स्वच्छतेसाठीच्या करत असलेल्या उपाययोजना व त्याची अंमलबजावणी याबाबतची माहिती दिली. ग्रामसेविका जयश्री चव्हाण यांनी महाविद्यालयाचे आभार मानले. प्रास्ताविक प्रा. दत्तात्रय मांजरे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. शशिकांत शिंदे, प्रा. समाधान लोंढे, ग्रा. पं. कर्मचारी सुदर्शन मांजरे, मुसाभाई मुलाणी यांनी परिश्रम घेतले.

Hello Solapur Gramin
Page No. 2 Jan 03, 2019
Powered by: erelego.com

पुढारी

# शिवाजी महाविद्यालयात मतदानाबाबत जागृती

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

श्री शिवाजी महाविद्यालयाच्यावतीने लोकशाही पंधरवडानिमित्त लोकशाही व निवडणुका याविषयावर एक दिवसीय मतदार जागृती कार्यशाळा झाली. सदर कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ.एस.एस. गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात होते. यावेळी कला शाखा समन्वयक प्रो.भारती रेवडकर, नॅक समन्वयक डॉ. एस.डी.पवार, कार्यशाळा समन्वयक डॉ.पी. एम. लावंड, डॉ. व्ही.बी. वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. गोरे म्हणाले की, स्वतंत्र भारताने लोकशाही व्यवस्था स्वीकारली असून ही लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदान जबाबदारीने केले पाहिजे. तसेच मतदार हा लोकशाहीचा मुख्य धागा आहे, असेही त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. थोरात यांनी भारताची लोकशाही व्यवस्थ प्रगल्भ करण्यासाठी युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्याचबरोबर निवडणूक काळात कोणत्या प्रलोभनाला बळी पड नका, असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रा. रत्नदीप सोनकांबळे यांनी लोकशाही व नैतिकता यांच्यात जवळचा संबंध असून लोकशाही व्यवस्थेत वंचित घटकाचे योग्य प्रतिनिधित्व असणे गरजेचे आहे. तसेच स्त्रीयांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेतल्याशिवाय सर्वांगिण प्रगती होणार नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले.

ॲड. विकास जाधव म्हणाले की, राजकारणाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघितले पाहिजे. तसेच युवकांनी जागृत राहून विघातक शक्तीच्या विरोधात लढले पाहिजे. प्रास्ताविक डॉ. लावंड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.एस.व्ही. लोंढे यांनी, तर आभार डी.एस. मांजरे यांनी मानले.

My Solapur Edition
19 Feb, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

लोकमत



बार्शी पंचायत समितीला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांसमवेत गटविकास अधिकारी प्रमोद काळे, डॉ. पंडित लावंड, प्रा. दत्तात्रय मांजरे आदी.

# स्थानिक स्वराज्य संस्था शासनाची पंचज्ञानेंद्रिये

## प्रमोद काळे : बार्शीत विद्यार्थ्यांशी संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी :** भारत सरकार व घटक राज्य सरकारांना देशाच्या कानाकोपऱ्यातून स्थानिक समस्या व विविध विषयांची माहिती देणाऱ्या संस्था या शासनाची पंचज्ञानेंद्रिये असल्याचे प्रतिपादन गटविकास अधिकारी प्रमोद काळे यांनी केले.

बार्शी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली बी. ए. भाग एकच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्वराज्य संस्थांना भेट या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ. पंडित लावंड, प्रा. दत्तात्रय मांजरे, प्रा. समाधान लोंढे, प्रा. राहुल पालके, डॉ. सोपान मोहिते उपस्थित होते. काळे म्हणाले, शासनाला विविध प्रकारची माहिती पुरविणे व शासनाच्या योजना, धोरणे यांची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी करणे असे महत्त्वपूर्ण कार्य पंचायत राज संस्था करतात. त्यांनी पं. स. बार्शीविषयी व कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली. विस्तार अधिकारी गायकवाड, बनसोडे, सदाफुले यांनी विविध विभागांच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी नगरपरिषद येथे भेट देऊन कामकाजाविषयी माहिती घेतली. यावेळी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले, प्रशासन अधिकारी शिवाजी कांबळे यांच्याशी संवाद साधला.

Hello Solapur Gramin
Page No. 4 Dec 22, 2018
Powered by: erelego.com

Lokmat News of Panchyat Samiti Visit dated: 4 December 2022